# FAQ: Annual Pass facility for FASTag Users

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ): FASTag वापरकर्त्यांसाठी वार्षिक पास सुविधा

**Q1. What is the FASTag Annual Pass?**

**प्रश्न 1. FASTag वार्षिक पास म्हणजे काय?**

Annual Pass activated on the FASTag allows free passage of private car/jeep/van at designated National Highway (NH) and National Expressway (NE) fee plazas for one year or 200 trips (whichever is earlier), without per-trip user fee charges. The Annual Pass will be effective from 15th August 2025.

FASTag वर सक्रिय केलेल्या वार्षिक पासमुळे खासगी कार/जीप/व्हॅनसाठी प्रत्येक ट्रिपसाठी वापरकर्ता शुल्काशिवाय एक वर्षासाठी किंवा 200 ट्रिप्स (जे आधी असेल ते) निर्दिष्ट राष्ट्रीय महामार्ग (NH) आणि राष्ट्रीय द्रुतगती महामार्ग (NE) / फी प्लाझावर वर मोफत प्रवास करण्याची परवानगी मिळते. हा वार्षिक पास 15 ऑगस्ट 2025 पासून लागू होईल.

**Q2. Where can I purchase the Annual Pass?**

**प्रश्न 2: मी वार्षिक पास कुठे खरेदी करू शकतो?**

The Annual Pass can be activated only on the Rajmargyatra mobile application and NHAI website.

वार्षिक पास फक्त राजमार्गयात्रा मोबाइल ॲप्लिकेशन आणि NHAI अधिकृत वेबसाइटवरच सक्रिय केला जाऊ शकतो.

**Q3. How will the Annual Pass be activated?**

**प्रश्न 3. वार्षिक पास कसा सक्रिय केला जाईल?**

The Annual Pass will be activated after verifying the eligibility of the vehicle and the associated FASTag. Upon successful verification, the user must make a payment of ₹3,000 for the base year 2025–26 through the Rajmargyatra mobile application or NHAI website. Once the payment is confirmed, the Annual Pass will be activated on the registered FASTag normally within 2 hours.

वाहनाची आणि संबंधित FASTag ची पात्रता तपासल्यानंतरच वार्षिक पास सक्रिय केला जाईल. यशस्वी पडताळणीनंतर, वापरकर्त्याला 2025–26 या मुलभूत

वर्षासाठी ₹3,000 ची रक्कम राजमार्गयात्रा मोबाइल ॲप्लिकेशन किंवा NHAI च्या वेबसाइटवरून भरावी लागेल. पेमेंटची पुष्टी झाल्यानंतर, वार्षिक पास नोंदणीकृत FASTag वर साधारणपणे 2 तासांच्या आत सक्रिय केला जाईल.

**Q4. If I already have a FASTag, do I need to buy a new one for the Annual Pass?**

**प्रश्न 4: जर माझ्याकडे आधीपासूनच FASTag असेल, तर वार्षिक पाससाठी मला नवीन FASTag घ्यावा लागेल का?**

No. You do not need to purchase a new FASTag. The Annual Pass can be activated on your existing FASTag, provided it meets the eligibility criteria (i.e., it is properly affixed on the vehicle's windshield, linked to a valid Vehicle Registration Number, not blacklisted etc).

नाही. तुम्हाला नवीन FASTag खरेदी करण्याची आवश्यकता नाही. जर तुमचा विद्यमान FASTag पात्रता निकष पूर्ण करत असेल (उदा. तो वाहनाच्या विंडशील्डवर योग्यरित्या लावलेला असेल, वैध वाहन नोंदणी क्रमांकाशी लिंक केलेला असेल, ब्लॅकलिस्ट केलेला नसेल इ.), तर त्यावरच वार्षिक पास सक्रिय केला जाऊ शकतो.

**Q5. Which Fee Plazas are covered under the Annual Pass?**

**प्रश्न 5. वार्षिक पास अंतर्गत कोणते टोल नाके /फी प्लाझा समाविष्ट केले जातात?**

It is valid only at National Highway (NH) and National Expressway (NE) fee plazas. At fee plazas on Expressways, State Highways (SH), etc. managed by State Governments or local bodies, parkings etc., the FASTag will operate as a regular FASTag, and applicable user fee charges may apply.

हा पास फक्त राष्ट्रीय महामार्ग (NH) आणि राष्ट्रीय द्रुतगती मार्ग (NE) वरील टोल नाक्यांकरता/ फी प्लाझावर वैध आहे. FASTag हे राज्य सरकार, स्थानिक संस्था किंवा खासगी कंपन्यांद्वारे व्यवस्थापित एक्सप्रेसवे, राज्य महामार्ग (SH), पार्किंग्स इत्यादी ठिकाणच्या टोल नाक्यांवर/ फी प्लाझावर सामान्य FASTag प्रमाणेच काम करेल आणि त्या ठिकाणी लागू वापरकर्ता शुल्क आकारले जाऊ शकते.

**Q6. How long is the Annual Pass valid?**

**प्रश्न 6: वार्षिक पास किती कालावधीसाठी वैध असतो?**

The Annual Pass is valid for one year from the date of activation or 200 transactions (trips), whichever comes first. Once the Annual Pass completes either 200 trips or one year from the date of activation, it will automatically revert to a regular FASTag. To continue using the Annual Pass benefits, the user will need to re-activate the Annual Pass to get 200 trips / 1 year validity.

वार्षिक पास हा सक्रिय केल्याच्या तारखेपासून एक वर्ष किंवा 200 फेऱ्या / ट्रिप्स यापैकी जे आधी येईल तोपर्यंत वैध असतो. एकदा 200 फेऱ्या / ट्रिप्स पूर्ण केल्यानंतर किंवा सक्रिय झाल्यापासून एक वर्ष पूर्ण झाल्यावर, तो FASTag आपोआप नियमित FASTag मध्ये रूपांतरित होतो. वार्षिक पासचे फायदे पुढेही मिळवण्यासाठी, वापरकर्त्याला 200 ट्रिप / 1 वर्षाची वैधता मिळविण्यासाठी वार्षिक पास पुन्हा सक्रिय करावा लागेल.

**Q7. Is the Annual Pass available for all vehicle types?**

**प्रश्न 7. सर्व प्रकारच्या वाहनांसाठी वार्षिक पास उपलब्ध आहे का?**

No. The Annual Pass is applicable only for private non-commercial Car/Jeep/Van after checking through VAHAN database. Use in any commercial vehicle will result in immediate deactivation without notice.

नाही. वार्षिक पास फक्त खासगी, व्यवसायिक वापरासाठी नसलेल्या कार/जीप/व्हॅन या वाहनांसाठीच लागू आहे आणि जो VAHAN डेटाबेसमधून तपासणी केल्यानंतरच जारी केला जातो. जर हा पास कोणत्याही व्यावसायिक वाहनात वापरल्याचे आढळले, तर कोणतीही सूचना न देता तो तात्काळ निष्क्रिय केले जाईल.

**Q8. Can I transfer my Annual Pass to another vehicle?**

**प्रश्न 8. मी माझा वार्षिक पास दुसऱ्या वाहनात हस्तांतरित करू शकतो का?**

No. The pass is non-transferable and is valid only for the vehicle on which the FASTag is affixed and registered. Using it on another vehicle will lead to deactivation.

नाही. हा पास ट्रांस्फर करता येत नाही आणि तो फक्त ज्यावर FASTag लावलेला आणि नोंदणीकृत आहे त्या वाहनासाठीच वैध आहे. हा पास दुसऱ्या वाहनासाठी वापरल्यास तो निष्क्रिय केला जाईल.

**Q9. Do I need to have the FASTag affixed on the vehicle's windshield?**

**प्रश्न 9. मला वाहनाच्या विंडशील्डवर FASTag लावण्याची आवश्यकता आहे का?**

Yes. The Annual Pass will be activated only on FASTags properly affixed to the windshield of the registered vehicle.

हो. वार्षिक पास फक्त नोंदणीकृत वाहनाच्या विंडशील्डला योग्यरित्या लावलेल्या FASTags वरच सक्रिय केला जाईल.

**Q10. Can I get an Annual Pass if my FASTag is registered using a chassis number?**

**प्रश्न 10: जर माझा FASTag चेसिस नंबरवर नोंदणीकृत असेल, तर मला वार्षिक पास मिळू शकतो का?**

No. The Annual Pass cannot be issued on FASTags registered only with a chassis number. You must update the Vehicle Registration Number (VRN) to activate the Annual Pass.

नाही. केवळ चेसिस नंबरवर नोंदणीकृत FASTag वर वार्षिक पास जारी केला जाऊ शकत नाही. वार्षिक पास सक्रिय करण्यासाठी तुम्ही वाहन नोंदणी क्रमांक (VRN) अपडेट करणे आवश्यक आहे.

**Q11. What counts as a single trip under the Annual Pass?**

**प्रश्न 11: वार्षिक पास अंतर्गत एक ट्रीप म्हणजे काय मानले जाते?**

- **For point-based fee plazas:** Each crossing of fee plaza counts as one trip. A round trip (to and fro) counts as two trips.
- **For Closed Tolling fee plazas**: One pair of entry and exit counts as one trip.

• **पॉइंट-आधारित फी प्लाझासाठी**: फी प्लाझाचे प्रत्येक क्रॉसिंग एक ट्रिप म्हणून गणले जाईल. एक राउंड ट्रिप (येणे आणि परतणे) दोन ट्रिप म्हणून गणले जाईल.

• **बंद टोलिंग फी प्लाझासाठी**: एकदा प्रवेश आणि एकदा बाहेर पडणे हे मिळून एक फेरी (ट्रिप) मानली जाते.

**Q12. Will I receive SMS notifications related to my Annual Pass?**

**प्रश्न 12. मला माझ्या वार्षिक पासच्या संदर्भात SMS सूचना प्राप्त होतील का?**

Yes. By activating the Annual Pass, you consent to allow Rajmargyatra to retrieve your registered mobile number from the issuing bank for the purpose of sending SMS alerts and other mode of communications.

होय. वार्षिक पास सक्रिय केल्यावर, तुम्ही राजमार्गयात्रा ॲपला तुमचा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक जारी करणाऱ्या बँकेकडून घेण्यास परवानगी देता, जेणेकरून SMS सूचना आणि इतर प्रकारच्या संप्रेषणासाठी तो वापरता येईल.

**Q13. Is Annual Pass mandatory or what if road user doesn't want to opt for Annual Pass?**

**प्रश्न 13. वार्षिक पास अनिवार्य आहे का किंवा रस्ता वापरणाऱ्याला वार्षिक पास घ्यायचा नसेल तर काय?**

The Annual Pass is not mandatory, existing FASTag ecosystem will continue to operate as is. Users who do not opt for the Annual Pass can continue to use their FASTag for regular transactions as per applicable user fee rates at fee plazas.

वार्षिक पास सक्तीचा नाही. विद्यमान FASTag प्रणाली नेहमीप्रमाणेच सुरू राहणार आहे. जे वापरकर्ते वार्षिक पास घेणार नाहीत, ते आपल्या FASTag चा वापर फी प्लाझावर संबंधित शुल्क दरानुसार नियमित व्यवहारांसाठी पूर्वीप्रमाणेच करू शकतात.

**Q 14. Do I need to recharge my FASTag with ₹3000, or can the existing FASTag balance be used for Annual Pass activation?**

**प्रश्न 14: मला FASTag मध्ये ₹3000 चा रिचार्ज करण्याची गरज आहे का, की वार्षिक पास सक्रिय करण्यासाठी विद्यमान शिल्लक वापरता येईल?**

No. In the first phase, the Annual Pass can only be activated through the Rajmargyatra App or website by making a payment of ₹3000 via the app/website. The existing balance in your FASTag wallet cannot be used for this purpose.

नाही. पहिल्या टप्प्यात, वार्षिक पास फक्त राजमार्गयात्रा ॲप किंवा वेबसाइटवरूनच ₹3000 ची रक्कम ॲप/वेबसाइटद्वारे भरून सक्रिय केला करावा लागेल. FASTag वॉलेटमधील विद्यमान शिल्लक रक्कम या उद्देशासाठी वापरता येणार नाही.